Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)
०६ ऑगस्ट, २०१९

# रामनगर पोलीसांची दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

## ०२ आरोपींसह ९ लक्ष २० हजाराचा मुदद्ेमाल हस्तगत

दिनांक ०६/०८/२०१९ पोलीस स्टेशन रामनगर येथील पोलीस पथक पहाटे दरम्यान रामनगर परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, दोन इसम एका चारचाकी वाहनाने वणी ते चंद्रपुर कडे दारूची तस्करी करणार आहे. अशा माहितीवरून रामनगर पोलीसांनी जनता कॉलेज चौक येथे नाकाबंदी लावुन संशयावरून एक मारोती रिट्स क्र. एमएच ३१ डीव्ही १५६५ वाहनाची तपासणी केली असता, वाहनात देशी दारूच्या ४० पेटया मिळुन आल्या. यावरून दोन आरोपी नामे १) अभिजीत प्रभाकर वांगलवार वय २९ वर्ष, २) रिजवान अहमद नियाज सिदद्ीकी वय २१ वर्ष यांना अटक करण्यात आली असुन वाहनासह एकुण ९,२०,०००/—रू चा मुदद्ेमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्री. डॉ. महेश्वर रेडड्ी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन रामनगर प्रभारी पोनि. श्री. हाके यांचे नेतृत्वात, पोउपनि श्री. संदीप कापडे यांचे सह सफौ सुधिर जाधव, पोहवा. मनोहर कामडी, पोना. किशोर वैरागडे, पोशि. राकेश निमगडे, विकास जुमनाके, रूपेश पराते मपोशि. भावना रामटेके यांनी पार पाडली.

———————————————————————————————————————